# (I) The Particulars Of Its Organisation,Functions And Duties;

## -: कृषि विभागाची रचना :-

वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्याचा पुरवठा करण्यासाठी शेतीच्या उत्पादनवाढीची गरज १९ व्या शतकात जाणवायला लागली. सन १८८१ च्या फ़ेमीन कमीशनने शिफ़ारस केल्यानुसार जुलै १८८३ मध्ये कृषि खात्याची स्थापना करण्यात आली. शेती क्षेत्राशी निगडीत सर्व विभागांचा त्यात समावेश करुन ग्रामीण भागात शेतीमधे उत्पादनवाढीसाठी शासनस्तरावरुन आवश्यक ती मदत करण्याच्या उद्देशाने कामाला सुरुवात झाली. सन १९०७ पर्यंत कृषि व भुमी अभिलेख ही खाती एकत्रितरित्या कार्यरत होती. सन १९१५-१६ मधे तत्कालीन कृषि संचालक श्रीयुत किटींग यांनी जमिनीची धुप थांबवण्यासाठी केलेल्या प्रयोगाचे आशादायक निष्कर्ष आल्यानंतर सन १९२२ पासुन मृद संधारणाची कामे सुरु केली.

सन १९४२ मध्यें संमत झालेला जमीन सुधारणा कायदा १९४३ मध्यें अंमलात आल्यापासून जमीन सुधारणांची विविध कामे कृषि खात्यामार्फत राबविण्यांत येवू लागली. सन १९४३ मध्यें तत्कालीन सरकारने कृषि व इतर पूरक क्षेत्रातील समस्यांचा विचार करुन शेतीकरता प्रथमच सर्वंकष कृषि धोरण आखले. या धोरणानुसार कृषि उत्पादनासाठी पाण्याचा सिंचन म्हणून उपयोग करण्यास सुरुवात झाली.

स्वातंत्र्योत्तर काळातील हरीतक्रांती पूर्वकाळ म्हणजे सन १९५० ते १९६५. या टप्प्यात शेतीच्या विकासाला चालना देण्यासाठी अनेक योजना आखल्या गेल्या. सन १९५७ पासून तालुका बिजगुणन केंद्रामार्फत दर्जेदार बियाणे उत्पादनास सुरुवात झाली. याकाळात लागवडीखालील क्षेत्राच्या विस्ताराबरोबच सिंचनाखालील क्षेत्र वाढवण्यावर भर दिला गेला. सन १९६१-६२ मध्यें रासायनिक खतांच्या वापरासाठी विशेष मोहीम हाती घेण्यांत आली.

सन १९६५-६६ पासून विविध पिकांच्या संकरीत वाण निर्मितीमुळे देशांत हरितक्रांतीचा पाया घातला गेला. यानंतरच्या काळातील पंचवार्षिक योजनांद्वारे शेती विकासावर विशेष भर देण्यांत आला. सन १९७४ पासून भुसुधारणेच्या कामाबरोबरच नाला बांधबंदिस्तीची कामे खात्यामार्फत सुरु झाल्याने विहिरी व भुगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ होण्यास मदत झाली. कृषि उत्पादन वाढीसाठी सधन शेती पध्दतीद्वारे बियाणे, खते,किटकनाशके व उपलब्ध पाण्याचा वापर मोठया प्रमाणावर सुरु झाला त्यामुळे कृषि उत्पादन वाढीस मदत झाली नंतर या गोष्टींचा शास्त्रोक्त पध्दतीने वापर व्हावा यासाठी शेतक-यांना अधिक मार्गदर्शनाची निकड लक्षात घेवून सन १९८१-८२ पासून प्रशिक्षण व भेट योजना सुरु करण्यांत आली. कृषि विद्यापीठातील सुधारीत तंत्रज्ञान सर्वसामान्य शेतक-यांपर्यत पोचवण्यासाठी आखलेल्या पीक प्रात्यक्षीके, प्रक्षेत्र भेटी, प्रचारसभा, चर्चासत्रे, मेळावे, प्रदर्शने इत्यादी कार्यक्रमांच्या परिणामकारक अंमलबजावणीमुळे कृषि उत्पादनवाढीमध्यें मोलाची भर पडली.

अन्नधान्याच्या उत्पादनात स्वयंपूर्ण झालो असलो तरी अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्णता हे राज्याचे एकमेव उद्दीष्ट नसून शेतक-यांना उपलब्ध संसाधनांचा परिपूर्ण वापर करुन अधिकाधिक आर्थिक फायदा मिळवून देणे नितांत गरजेचे आहे.यासाठी व्यापारक्षम शेतीची कास धरावी लागेल. मुक्त आर्थिक व्यवस्था व जागतीक व्यापार व्यवस्थेचा फायदा करुन घेण्याच्या दृष्टिने कृषि फलोत्पादन व जलसंधारण क्षेत्रात कृषि उत्पादन वाढ, निर्यातवृध्दी व कृषि प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देण्याच्या अनेकविध योजना राबविण्यांत येत आहेत. अशाप्रकारे शेतीव्यवसायातून स्वयंपूर्णतेबरोबरच आर्थिक उन्नती साधणे व जागतीक शेतमालाच्या बाजारपेठेत महत्वाचे स्थान मिळविणे या निर्धाराने कृषि विभागाची वाटचाल सुरु आहे. महाराष्ट्र शासन राबवत असलेली, रोजगार हमी योजने अंतर्गत फळबाग लागवडीची महत्वाकांक्षी योजना हा या धोरणाचाच भाग आहे.

## कृषि खात्याची पुनर्रचना

सन १९९८ पर्यंत कृषि विभागात मृद व जलसंधारण, फलोत्पादन विभाग व कृषि विस्तार विभाग हे तीन स्वतंत्र विभाग कार्यरत होते. प्रत्येक विभागातील क्षेत्रीय पातळीवरील कर्मचाऱ्यांचे कार्यक्षेत्र जास्त गावांचे असल्याने तीन विभांगाचे स्वतंत्र कर्मचारी त्यामध्ये कार्यरत होते. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीविषयक कामासाठी तीनही यंत्रणेच्या कर्मचाऱ्यांशी संपर्क साधणे अत्यंत जिकरीचे होत असे. कृषि खात्यामध्ये मंडळ व तालुका स्तरावर कार्यालय नसल्याने शेतकऱ्यांना उपविभाग अथवा जिल्हा स्तरावर संपर्क साधावा लागत होता व हे शेतकऱ्यांना गैरसोयीचे होते. या व अशा इतर अडचणी विचारात घेऊन शासनाचे कृषि व पदुम विभाग निर्णय क्र. आकृवि-१२९८/प्रक्र-६१/१५-अे, दि. २९.५.१९९८ अन्वये कृषि खात्याची पुर्नरचना करुन तीनही यंत्रणांचे (कृषि विस्तार, फलोत्पादन व मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन) दि.१.७.१९९८ पासून एकत्रिकरण करुन एक खिडकी योजना राबविण्याचा निर्णय घेतला असून त्याची अंमलबजावणी करण्यात आली.

एक खिडकी योजनेनुसार कृषि, फलोत्पादन व मृदसंधारण पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन या तिनही यंत्रनांचे एकत्रीकरण करुन आयुक्त कृषि यांच्या अधिपत्याखाली पुढील प्रमाणे फेररचना करण्यात आली.

## क्षेत्रिय स्तरः-

**१) मंडळ स्तरः-** १२ कृषि सहाय्यकांचे कार्यक्षेत्र मिळून मंडळ कार्यालय स्थापन करण्यात आलेले आहे. या कार्यालयात कृषि अधिका-याची कार्यालय प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यांचे अधिनस्त चार कृषि सहाय्यकाच्या मागे एक कृषि पर्यवेक्षक या प्रमाणे तीन कृषि पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. राज्यात एकूण ९१० मंडळ कार्यरत आहेत.

२) **तालुका स्तरः-** प्रत्येक तालुक्याकरीता कृषि विभागाचे स्वतंत्र कार्यालय असून तालुक्याचे मुख्यालय स्थापन करण्यात येवून कार्यालय प्रमुख म्हणून म.कृ.से. वर्ग-२ संवर्गातील अधिका-याची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

३) **उपविभाग स्तरः-** राज्यातील भौगोलीक परिस्थीतीचा विचार करुन सुमारे दोन ते पाच तालुका मिळून उपविभागाची स्थापना करण्यात आलेली आहे या कार्यालयाचा प्रमुख म्हणून म.कृ.से.वर्ग-१ संवर्गातील अधिका-याची नियुक्ती करण्यात आलेली आहे. राज्यात एकूण ९० उपविभाग स्थापन करण्यात आलेल आहेत.

४) **जिल्हा स्तरः-** जिल्हास्तरावर पुर्वि कृषि विभागाचे प्रमुख कृषि अधिकारी, फलोत्पादन उपसंचाक व विभागीय मृदसंधारण अधिकारी ईत्यादी कार्यालये अस्तीत्वात होती. या कार्यालयांचे एकत्रिकरण करुन नविन कार्यालय सुरु करण्यात आले. कार्यालय प्रमुख म्हणून म.कृ.से.वर्ग-१ मधिल (अतिकालीक वेतनश्रेणीतील) अधिक्षक कृषि अधिकारी संवर्गातील अधिकरी पदस्थपीत करण्यात आले. त्यांना **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी** असे संबोधन्यात येते.

५) **विभाग स्तरः-** पुर्वि कृषि विभागाची विभागीय स्तरावर अधिक्षक कृषि अधिकारी, अधिक्षक फलोत्पादन अधिकारी व विभागीय कृषि सहसंचालक अशी स्वतंत्र कार्यालये होती. या सर्व कार्यालयांचे एकत्रिकरण करुन स्वतंत्र कार्यालय स्थापन करण्यात आले. या कार्यालयात कृषि सहसंचालक संवर्गातील अधिका-याची विभागप्रमुख म्हणून पदस्थापना करण्यात आलेली आहे. **राज्यात एकूण आठ विभागीय कार्यालये आहेत. ती पुढील प्रमाणे आहेत. ठाणे, नासिक, पुणे कोल्हापूर, औरंगाबाद, लातूर, अमरावती व नागपूर.**

६) **आयुक्तालय स्तरः-** आयुक्तालय स्तरावर दहा विभाग स्थापन करण्यात येवून ते कृषि आयुक्तांच्या अधिनस्त कार्यरत आहेत.

**१. संचालक (विस्तार व प्रशिक्षण), २. संचालक (मृदसंधारण) ३. संचालक (फलोत्पादन),**
**४. संचालक (निविष्ठ व गुणनियंत्रण), ५. कृषि सहसंचालक(आस्थापना),**
**६. मुख्य साख्यिक, ७. उपआयुक्त कृषि गणना, ८. प्रमुख सनियंत्रण व मुल्यमापन,**
**९. दक्षता पथक व १०.लेखा विभाग**

क्षेत्रिय स्तर ते आयुक्तालय स्तरापर्यंत कार्यरत असलेल्या कार्यालयांचा रचनात्मक तक्ता सोबत जोडला आहे.

ooooo